# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्ग,केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
Solapur-Pune National Highway, Kegoan, Solapur - 413 255, Maharashtra (India)

दुरध्वनी क्र. 0217-2744771/ 72/ 73 (11 लाईन्स) विस्तारित क्र. 105 ईमेल - registrar@sus.ac.in संकेतस्थळ : https://www.sus.ac.in

**कुलसचिव कार्यालय Registrar Office**


जा.क्र. पुअहोसोविसो/कु.का./२०२६/4580 दि. 16 MAY 2026

प्रति,

१) मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

२) मा. संचालक,
विद्यापीठ परिसर सर्व शैक्षणिक संकुले,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर
विद्यापीठ, सोलापूर

३) मा. विभागप्रमुख,
सर्व प्रशासकीय विभाग,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय : भारताचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार सार्वजनिक वाहनांचा वापर, इंधन बचत, स्वदेशीचा आग्रह, परदेश दौरे आणि जीवनशैलीत बदलाबाबत जनजागृती करणेबाबत.**

संदर्भ : उच्च शिक्षण संचालनालय, पुणे कार्यालयाचे पत्र क्र. उशिसं/जीवन शैली बदलाबाबत/ मवि-१/ २०२६/ ई / ६८५, दि. १३ मे २०२६ रोजीचे पत्र

**महोदय / महोदया,**

उपरोक्त संदर्भाधीन विषयान्वये, सध्याच्या जागतिक परिस्थितीचा विचार करता, आपल्या देशाची आर्थिक स्थिती अधिक बळकट करण्यासाठी आणि विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी देशाचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून सार्वजनिक वाहतुकीचा वापर, इंधन व ऊर्जा बचत, अनावश्यक परदेश दौरे व खर्च टाळणे, महत्वाच्या / अतिमहत्वाच्या बैठकां व्यतिरिक्त इतर बैठका ऑनलाईन माध्यमातून घेणेबाबत, स्वदेशीचा आग्रह आणि स्थानिक पर्यटनाला चालना देणे या सारख्या मुद्दयांचे पालन करण्याबाबत आवाहन केले आहे.

याबाबत उच्च शिक्षण संचालनालय, पुणे कार्यालयाच्या संदर्भाधीन पत्रान्वये, राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये आणि उच्च शैक्षणिक संस्थांनी या आवाहनाची गांभीर्याने दखल घ्यावी. या विषयावर चर्चासत्रे, वेबिनार आणि जनजागृती मोहिमा राबवून विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांना या मोहिमेत सहभागी करुन घ्यावे, असे सूचित केले आहे. सोबत संदर्भिय पत्र जोडले आहे.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मा. पंतप्रधान, श्री. नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाच्या अनुषंगाने शासन पत्रान्वये सूचित केल्यानुसार तात्काळ आवश्यक ती कार्यवाही आपल्यास्तरावरुन करावी. तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीचा संक्षिप्त अनुपालन अहवाल आवश्यक तपशीलासह या कार्यालयास ( registrar@sus.ac.in या ईमेलवर ) सादर करावा.

धन्यवाद.

आपला स्नेहांकित,

(डॉ. अतुल लकडे)
प्र. कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**प्रत माहितीस्तव :**
मा. प्र. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे

# महाराष्ट्र शासन

## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

**४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६**

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९


क्र. उशिसं/जीवन शैली बदलाबाबत/मवि-१/२०२६/ई /1885 दि.१३.५.२०२६

13 MAY 2026

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

२. सर्व कुलसचिव,
राज्य सार्वजनिक विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

विषयः भारताचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार सार्वजनिक वाहनांचा वापर, इंधन बचत, स्वदेशीचा आग्रह, परदेश दौरे आणि जीवनशैलीत बदलाबाबत जनजागृती करणेबाबत.

संदर्भः मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रहिताच्या दृष्टीने केलेले आवाहन.

उपरोक्त विषयान्वये आपणास सूचित करण्यात येते की, देशाचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या आवाहनानुसार सध्याच्या जागतिक परिस्थितीचा विचार करता, आपल्या देशाची आर्थिक स्थिती अधिक बळकट करण्यासाठी आणि विकासाचे उद्दिष्ठ साध्य करण्यासाठी खालील मुद्द्यांचे पालन करणेबाबत आवाहन केले आहे.

1. सार्वजनिक वाहतुकीचा वापरः शक्य असेल तिथे खाजगी वाहनांचा वापर टाळून मेट्रो रेल्वे आणि इतर सार्वजनिक वाहतूक साधनांचा वापर करावा. यामुळे इंधनाची बचत होईल आणि पर्यावरणाचे रक्षण होईल.
2. इंधन व ऊर्जा बचतः पेट्रोल-डिझेलचा मर्यादित वापर आणि इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य देण्याबाबत सर्व शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घ्यावा. 'कार-पूलिंग' (Car-pooling) सारख्या संकल्पनांना प्रोत्साहन द्यावे.
3. परदेश दौरे व अनावश्यक खर्चः सध्याची परकीय चलन साठ्याची स्थिती आणि जागतिक परिस्थिती पाहता, तातडीचे किंवा अपरिहार्य असल्याशिवाय परदेश दौरे टाळावेत.
4. महत्वाच्या/अतिमहत्वाच्या बैठकांव्यतिरिक्त इतर बैठका प्रत्यक्ष उपस्थित राहून घेण्याऐवजी ऑनलाईन माध्यमातून (Online Meetings) आणि व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यास प्राधान्य द्यावे.
5. स्वदेशीचा आग्रहः भारताची आयात व वित्तीय तूट कमी करण्यासाठी आणि आत्मनिर्भर भारताला पाठबळ देण्यासाठी जास्तीत जास्त स्वदेशी वस्तूंचा वापर करावा.
6. जीवनशैलीत बदलः स्थानिक पर्यटनाला (Domestic Tourism) चालना देणे यांसारख्या उपक्रमांचा अवलंब करावा.

राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये आणि उच्च शैक्षणिक संस्थांनी या आवाहनाची गांभीर्याने दखल घ्यावी. शैक्षणिक संकुलांमध्ये (Campuses) या विषयावर चर्चासत्रे, वेबिनार आणि जनजागृती मोहिमा राबवून विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या मोहिमेत सहभागी करून घ्यावे. तरी, आपल्या स्तरावरून आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांना आणि विभागांना या संदर्भात तात्काळ सूचना निर्गमित कराव्यात आणि केलेल्या कार्यवाहीचा संक्षिप्त अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६

प्रत माहितीसाठी सादरः

मा. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-32.
मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-32.